राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक तात्काळ

क्र.रानिआ /जिपपंस २०२४/प्र.क्र. ११/का.७,
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०००३२
दिनांक:- ०३/०७/२०२४

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी, (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व गटविकास अधिकारी

विषय:- जिल्हा परिषद/पंचायत समितीमध्ये नैमित्तीक रिकाम्या जागांची माहिती राज्य निवडणूक आयोगास तात्काळ कळविण्याबाबत.

संदर्भ:-१)आयोगाचे क्र.रानिआ/जिपपंस-२०१५/प्र.क्र.१२/का.०७,दि.२३/०२/२०१५ रोजीचे परिपत्रक.
२)आयोगाचे क्र.रानिआ/ग्रापनि-२०१५/प्र.क्र.२२/का.०८,दि.२३/११/२०१५ रोजीचे पत्र.

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भाधीन क्र.०१ रोजीच्या परिपत्रकानुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा, गटविकास अधिकारी, सर्व पंचायत समित्या यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ कलम ४१ व ६३ मधील तरतुदींनुसार सदस्य पदाची एखादी जागा राजीनामा, निधन, अनर्ह ठरणे इ. विविध कारणांमुळे रिक्त झाल्यास आयोगास तात्काळ कळविण्याबाबत सूचित केले होते.

तद्नंतरही सदरची माहिती विहित वेळेत प्राप्त होत नसल्याने संदर्भाधीन क्र.०२ रोजीच्या पत्रान्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक/पोट निवडणुकांच्या संदर्भात (जिल्हा परिषद/पंचायत समिती, नगरपरिषदा/नगर पंचायती व ग्रामपंचायती) सर्व विभागीय आयुक्त यांनी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यामार्फत सर्व बाबीचा रितसर आढावा घ्यावा व त्याचा अहवाल राज्य निवडणूक आयुक्त यांना दर महिन्याला ३० तारखेपूर्वी सादर करावा असे आदेशित केले होते. असे असूनही राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, संबंधित अधिकारी अधिनियमातील तरतुदींनुसार जिल्हा परिषद/पंचायत समितीमधील विविध कारणास्तव रिक्त होणाऱ्या पदांची माहिती राज्य निवडणूक आयोगाकडे नियमित सादर करीत नाहीत. प्रत्येकवेळी आयोगाकडून माहिती मागविल्यानंतरच रिक्त पदांची माहिती सादर करण्यात येते व त्याकरिताही वारंवार पाठपुरावा करावा लागतो. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगावर असलेली

संविधानिक जबाबदारी पार पाडण्यात विलंब होत असून पोट निवडणुका विहित वेळेत पार पाडणे शक्य होत नाही. या सर्व बाबींचा विचार करता जिल्हा परिषद/पंचायत समितीमधील रिक्त पदाची माहिती राज्य निवडणूक आयोगास पाठविण्यासंदर्भात राज्य निवडणूक आयोग पुन्हा नव्याने खालीलप्रमाणे आदेश देत आहे:-

१) जिल्हा परिषद/पंचायत समितीचा कालावधी समाप्तीपूर्वी एखाद्या सदस्याचे पद राजीनामा, निधन किंवा अनर्हता या कारणांमुळे रिक्त झाल्यास त्याबाबतचा अहवाल संबंधित उपमुख्य कार्यकारी अधिकारी व गट विकास अधिकारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यामार्फत तात्काळ राज्य निवडणूक आयोगास पाठवावा. तसेच त्याची प्रत जिल्हाधिकारी कार्यालयासही पाठवावी.

२) जिल्हा परिषद/पंचायत समितीच्या सदस्यांचे जात प्रमाणपत्र अवैध, जात वैधताप्रमाणपत्र विहित मुदतीत सादर न करणे इत्यादी प्रकरणी सदस्यास अनर्ह ठरविण्यात येणाऱ्या आदेशांची प्रत संबंधित विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी न चुकता राज्य निवडणूक आयोगास पाठवावी.

३) विभागीय आयुक्त यांनी आपल्या विभागातील सर्व जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या मासिक सभेमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (जिल्हा परिषद/पंचायत समिती, नगरपरिषदा/नगर पंचायती व ग्रामपंचायती) निवडणुकांशी संबंधित असलेल्या बाबींचा सर्वांगीण आढावा घ्यावा व त्याबाबतचा आपला अहवाल राज्य निवडणूक आयुक्त,महाराष्ट्र यांना दर महिन्याला ३० तारखेपूर्वी विनाविलंब सादर करावा. कोणत्याही परिस्थितीत राज्य निवडणूक आयोगास त्याबाबत वारंवार माहिती घेण्याची आवश्यकता निर्माण होणार नाही, याचीही खबरदारी घ्यावी.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

03.07.2024

( सुरेश काकाणी )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:- मा.प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मर्झबान रोड, मुंबई ४०००१ यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

G:\Varade Computer\ZPPS\Vacant post in ZPPS.doc